# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०३.०२.२०२३**

**जिल्हा : सांगली**

| मागील आठवड्यातील हवामान (२८.०१.२०२३ ते ०३.०२.२०२३) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०४.०२.२०२३ ते ०८.०२.२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ | ०३ | दिनांक | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३२.० | ३३.० | ३४.० | ३५.० | ३५.० |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | १६.० | १६.० | १७.० | १७.० | १६.० |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | २ | ० | १ | २ | २ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५८ | ५२ | ५६ | ५५ | ५५ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३७ | ३३ | ३४ | ३२ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १३.० | ११.९ | ११.५ | ११.६ | १०.२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | पु.ई. | पु.ई. | पु.ई. | पु.ई. | पु.ई. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक ४ ते ८ फेब्रुवारी दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३२.० ते ३५.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १६ ते १७ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सळची सापेक्ष आद्रता ५२ ते ५८% तर दुपारची सापेक्ष आद्रता ३२ ते ३७% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी १०.२ ते १३.० कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ शेतकरी बंधूनी कार्यक्षम जलसिंचन व्यवस्थापणासाठी पिकाच्या अवस्थेनुसार, जमिनीच्या प्रकाराप्रमाणे शेतामधील विविध पिकांच्या पाण्याची गरज व सिंचन संच चालू ठेवण्याचा कालावधी ई. महत्वपूर्ण माहिती आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " फुले इरिगेशन शेड्यूलर (PIS)" हे अॅप डाउनलोड करून वापरावे.<br>➢ फळबागेतील तापमान नियंत्रित राहण्यासाठी फळबागांना शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी द्यावे. |
| संदेश | | फेब्रुवारी महिन्यामध्ये ऊस पिकास दररोज ३.२७ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ४९ मिनिटे चालवावा. |
| गहू | फुलोरा ते दाणे भरणे | ➢ गहू पेरणीस ८० ते ८५ दिवस झाले असल्यास दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना पिकास पाणी द्यावे.<br>➢ गहू पिकावरील मावा किडीच्या नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम २५ डब्लूजी ५० ग्रॅम प्रती हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | दाणे भरणे ते पक्वता | ➢ पक्व होत असलेल्या ज्वारी पिकाचे पक्षांपासून संरक्षण करावे.<br>➢ ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपक्याचे लक्षणे दिसताच ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत. |
| हरभरा | फुलोरा ते घाटे भरणे | ➢ हरभऱ्यावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत.<br>➢ हरभऱ्यावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी हेलिओकिल ५०० मिली ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून प्रती हेक्टर फवारणी करावी. |
| ऊस | लागवड | ➢ सुरु उस लागवड १५ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण केल्यास उस उत्पादकता व साखरेचा उतारा चांगला मिळतो. आडसाली उस लागवडीसाठी को. ८६०३२ (नीरा) किंवा को.एम.०२६५ (फुले २६५) या जातींची निवड करावी. एक डोळा रोपांपासून (३० ते ४५ दिवस वयाच्या रोपांची ) ऊस लागवड करावी त्यामुळे नेहमीच्या तुलनेत ऊस लागणीस ३० ते ४५ दिवसांपर्यंत जोपासण्यासाठी लागणारे पाणी, तण नियंत्रण, खते,देखरेख यांची बचत होते. बेण्याद्वारे लागवड करावयाची असल्यास बेणे मळ्यात वाढवलेले ९ ते १० महिने वयाचे निरोगी, रसरशीत आणि अनुवांशिक दृष्ट्या शुद्ध ऊस बेणे वापरावे. |
| द्राक्ष | मणी वाढीची | ➢ हवेमध्ये जास्त आद्रता असल्याने व किमान तापमानात घट झाल्याने भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी अमपेलोमायसेस क्विसक्वालीस @ ५ ग्रॅम प्रती लिटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | ➢ बागेमध्ये तापमान नियंत्रित राहण्यासाठी द्राक्ष बागेस सायंकाळी पाणी द्यावे.<br>➢ कमाल आणि किमान तापमानामध्ये जास्त फरक दिसून येत आहे त्यामुळे द्राक्ष मणी गुलाबी होण्याच्या समस्या निर्माण होत आहे. हि समस्या निर्माण होऊ नये म्हणून द्राक्ष घड पेपरचा वापर करून झाकावेत. |
| **हळद** | पक्वता | ➢ हळद पिकाची काढणी जातीनुसार पिकाचा कालावधी पूर्ण झाल्यावर करावी. काढणीपुर्वी जमिनीच्या प्रतीनुसार १५ ते २० दिवस पाणी देणे बंद करावे. |
| **बटाटा** | वाढीची | ➢ बटाटा पिकावर काही ठिकाणी मावा किडीचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५% डब्ल्यू. जी. २ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी याप्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| **डाळिंब** | वाढीची | ➢ डाळिंब फळपिकावर मावा, फुलकिडे, पांढरी माशी व फळे पोखरणारी आळी यांचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी सायनट्रिनीलप्रोल १०.२६% ओ.डी. ७ ते ९ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **पशुधन** | वाढीची | ➢ उन्हाळी हंगामासाठी ज्वारी, मका, चवळी, आणि संकरीत नेपियर गवत या चारा पिकांची लागवड करावी.<br>➢ रात्री जनावरे गोठ्यात बांधावीत आणि त्यांना थंडीतून बचावासाठी कोरडी उबदार जागा उपलब्ध करून द्यावी |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. :०३.०२.२०२३

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**